## दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२१/२०११ मधील नि.२४ वरील आदेश

(**CNR–MHAH** २३–०००१९३–२०१४)

१. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. अर्जदार यांनी अर्जात कथन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज सामनेवालाविरुध्द मुळ दावा क्रमांक १५८/१९९९ हा पुन्हा फैलावर घेणेकामी दाखल केला असून अर्जदाराने मुळ अर्जामध्ये सदरचा दावा पुन्हा फैलावर घेणेबाबतची कथने व कारणे नमूद केली आहेत. अर्जदाराच्या कथनानूसार अर्जदार याचेकडून मुळ अर्ज दाखल करण्यास कोणताही विलंब झालेला नाही, परंतु नजरचूकीने अर्जदाराकडून विलंब/उशीर माफीबाबत अर्ज देण्याचे राहून गेले होते. सबब मुळ अर्जाचे कामकाजामध्ये कोणताही तांत्रीक दोष राहु नये याकरीता अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. सामनेवाला क्र.१,३ व ४ यांनी अर्जास निशाणी २७ येथे म्हणणे दिले असून त्यामधील मजकूर नाकारला आहे. त्यांच्या म्हणण्यानूसार मुळ अर्जामध्ये अर्जदार यांचा पुरावा झाला असून त्यांनी प्रस्तुतचा अर्ज हा ब–याच विलंबाने दिलेला आहे. त्यामुळे तो अर्ज कायदेशीर नसून, अर्जदार यांना मुळ अर्ज दाखल करण्यास विलंब झाला असून तो असंयुक्तीक कारणातूनच झाला आहे. त्यामुळे अर्जदार यांचे अर्जातील मागणी कायदेशीर व संयुक्तीक नसल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा अशी सामनेवाला यांनी विनंती केली आहे.

४. अर्जदार यांचेतर्फे दाखल करण्यात आलेल्या मुळ अर्जाचे अवलोकन केले असता सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश IX नियम 4 प्रमाणे मुळ

रे.मु.नं.१५८/१९९९ चा दावा पुन्हा फैलावर घेणेबाबत दाखल केल्याचे दिसून येते. मुदतीचा कायदा, १९६३ च्या आर्टीकल १२२ प्रमाणे सदरचा अर्ज हा दावा निकाली तारखेपासून ३० दिवसांच्या आत दाखल करणे गरजेचे आहे. परंतु अभिलेखाचे अवलोकन केले असता रे.मु.नं.१५८/१९९९ हा दावा दिनांक २७/०६/२०११ रोजी काढून टाकण्यात आला होता व प्रस्तुतचा मुळ अर्ज दिनांक २६/०८/२०११ रोजी दाखल करण्यात आला आहे. असे असले तरीही अर्जदारातर्फे निशाणी १८ येथे दाखल करण्यात आलेल्या रे.मु.नं.१५८/१९९९ मधील निशाणी १ व त्यावरील आदेशाच्या प्रमाणित प्रतीचे अवलोकन केले असता सदर प्रत मिळणेबाबतचा अर्ज दिनांक १४/०७/२०११ रोजी दाखल केल्याचे व त्याची प्रमाणित प्रत दिनांक १८/०८/२०११ रोजी मिळाल्याचे नमूद करण्यात आले आहे. अशा परिस्थितीत अर्जदारातर्फे दावा काढून टाकल्यानंतर ३० दिवसांच्या मुदतीच्या आत दावा व त्यावरील आदेशाची प्रमाणित प्रत मिळणेकरीता अर्ज दाखल केल्याचे व त्यानूसार दिनांक १८/०८/२०११ रोजी अर्जदारास त्या प्रती मिळाल्याचे दिसून येते.

५. अशा परिस्थितीत मुदतीचा कायदा, १९६३ च्या आर्टीकल १२२ मधील मुदतीचा विचार केला असता अर्जदार यांना मुळ अर्ज दाखल करण्यास १ महिन्याचा विलंब झाल्याचे दिसून येते. असे असले तरीही मुळ अर्जाचा निर्णय गुणदोषावर होण्यासाठी व वर नमूद केलेल्या कारणांचा साकल्याने विचार करता प्रस्तुतचा अर्ज दाखल करणेस झालेल्या विलंबाबाबत सामनेवाला यांना खर्चाची रक्कम देण्याचे आदेशित करुन प्रस्तुत अर्ज मंजुर

करणे योग्य व न्यायोचित होईल. करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेः–

**आ दे श**

१. अर्ज निशाणी क्रमांक २४ हा अर्जदार याने सामनेवाला यांना खर्चाची रक्कम रु.५००/– देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

AMIT NAGESH KULKARNI
Digitally signed by AMIT NAGESH KULKARNI
Date: 2025.07.28 16:55:12 +0530

दिनांकः–२८/०७/२०२५
श्रीगोंदा.

**( ए. एन. कुलकर्णी )**
सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
श्रीगोंदा